पोलीस स्टेशन पाटोदा ता. पाटोदा जि. बीड

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District** (जिल्हा): बीड **P.S.**(ठाणे): पाटोदा **Year** (वर्ष): 2023

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0113 **Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 01/06/2023 00:07 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): बुधवार **Date From** (दिनांक पासून): 31/05/2023

**Time Period** (कालावधी): प्रहर 5 **Date To** ( दिनांक पर्यंत): 31/05/2023

**Time From** (वेळेपासून): 14:18 बजे

**Time To** (वेळेपर्यंत): 14:18 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

**Date** (दिनांक ): 31/05/2023 **Time** (वेळ): 23:56 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ

**Entry No.** (नोंद क्र.): 037 **Date & Time** (दिनांक आणि वेळ): 31/05/2023 23:56 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): Oral

5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर): उत्तर, 0.1 किमी

**Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): , पाटोदा येथील मंडळ कृषी अधिका,पाटोदा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):

**District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): श्री. दिलीप आश्राजी सानप

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1975 (d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.): **Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, युआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

(h) **Address** (पत्ता):

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | सौताडा,पाटोदा,पाटोदा,बीड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | सौताडा,पाटोदा,पाटोदा,बीड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.): **Mobile** (मोबाइल नं.): 91-9421280158

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपींचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री.कृष्णा महादेव आगलावे | | | 1. शिवकृपा सदन, मांजरसुंबा रोड, , पाटोदा,पाटोदा,बीड,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 1500/रुपये | 1,500.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये)): 1,500.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any** (इनक्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

ला.प्र.वि कार्यालय बीड

फिर्याद

दिनांक:- 31/05/2023.मी दिलीप आश्राजी सानप, वय-48 वर्ष, व्यवसाय शेती, रा.सौताडा ता.पाटोदा जि.बीड मो.क्र.7620373119, 9421280158मी दिनांक 30/05/2023 रोजी श्री.रविंद्र परदेशी, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड यांचे समक्ष पाटोदा येथे सुरक्षीत ठिकाणी पंचासमक्ष तक्रार दिली की, माझे नावे राष्ट्रीय कृषी विकास योजना सन-2018-2019 अंतर्गत कांदा चाळ मंजुर झाली होती. मी माझे शेतामध्ये कांदा चाळ उभारणीचे काम पुर्ण करुन बील ऑनलाईन अपलोड केले. श्री.आगलावे, मंडळ कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, पाटोदा हे माझ्याकडे मंजुर कांदा चाळीचे अनुदान मिळणेकरीता कांदा चाळीचा मोका तपासणी अहवाल व बील अपलोड करण्यासाठी 2000/-रु. लाचेची मागणी करीत आहेत. वगैरे मजकुराची तक्रार दिली.पोनि/परदेशी यांनी माझे तक्रारीचे अनुषंगाने दिनांक 30/05/2023 रोजी श्री.आगलावे हे माझ्याकडे लाचेची मागणी करतात किंवा कसे ? याबाबत लाचमागणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगीतले. त्यावरुन मला व पंच क्रमांक-1 श्री.गायकवाड यांना श्री.आगलावे यांचेकडे तालुका कृषी अधिकारी कार्यालय, पाटोदा येथे पाठवुन लाचमागणी पडताळणी करण्याचे सर्वानुमते ठरले. पोनि/परदेशी यांनी मला व पंचांना एकंदरीत सापळा कारवाई कशी असते याबाबत माहिती देऊन लाचमागणी पडताळणीचे अनुषंगाने सुचना देऊन व्हाईस रेकॉर्डर बाबत सविस्तर माहिती देऊन प्रात्यक्षीक करुन दाखवले. पोनि/परदेशी यांनी मला व पंच क्रमांक 1 श्री.गायकवाड यांना तालुका कृषी अधिकारी कार्यालय, पाटोदा येथे श्री.आगलावे यांचेकडे पाठवुन व्हाईस रेकॉर्डरचे मदतीने लाचमागणी पडताळणी केली असता, मी व श्री.आगलावे यांची तालुका कृषी अधिकारी कार्यालय, पाटोदा येथे भेट झाली नाही. त्यामुळे मी श्री.आगलावे यांना फोन करुन बोललो असता, त्यांनी आलो आहे असे सांगीतले. त्यानंतर काही वेळाने श्री.आगलावे साहेब कार्यालयामध्ये हजर आले. माझी श्री.आगलावे यांचेसोबत माझे कामसंदर्भाने चर्चा झाली. श्री.आगलावे यांनी मला, पंच क्रमांक 1 श्री.गायकवाड यांना बिलाची फाईल आणणे बाबत सांगीतले. त्यावेळी मी त्यांना आम्ही सोबत जाऊन फाईल घेऊन येतो असे म्हणुन बाकीच काही सांगा असे म्हणालो असता, श्री.आगलावे यांनी त्यांचे उजवे हाताचे दोन बोटे दाखवुन दोन हजार रुपयाची मागणी केली. त्यानंतर मी व पंच क्रमांक 1 श्री. गायकवाड असे सुरक्षीत ठिकाणी परत आलोत. पोनि/परदेशी यांनी मला व पंच क्रमांक 1 यांना स्वतंत्र विचारणा करुन व्हाईस रेकॉर्डर मधील संभाषण ऐकले असता, श्री.आगलावे यांनी माझ्याकडे स्पष्ट लाचेची मागणी केल्याचे दिसुन आले नाही. त्यामुळे मला व पंच क्रमांक 1 श्री. गायकवाड यांना श्री.आगलावे यांचेकडे पाठवुन पुन्हा लाच मागणी पडताळणी करण्याचे ठरले. पोनि/परदेशी यांनी मला व पंच क्रमांक 1 श्री. गायकवाड यांना तालुका कृषी अधिकारी कार्यालय, पाटोदा येथे श्री.आगलावे यांचेकडे पाठवुन व्हाईस रेकॉर्डरचे मदतीने लाचमागणी पडताळणी केली असता, माझी श्री.आगलावे यांचेशी भेट झाली नाही. त्यामुळे मी त्यांना फोन केला असता, त्यांनी [illegible] सांगीतले. त्यानंतर काही

वेळाने श्री.आगलावे कार्यालयामध्ये हजर आले. माझी त्यांचेशी माझे कामसंदर्भाने चर्चा झाली. मी बिलांची फाईल श्री.आगलावे यांचेकडे देऊन उर्वरीत बील नंतर देतो असे म्हणालो त्यावेळी त्यांनी बील तात्या फिटरकडे देण्यास सांगितले. श्री.आगलावे यांनी मला उजवे हाताचे दोन बोटे दाखवुन दोन हजार रुपयाची मागणी केली त्यावेळी त्यांना दोन हजार रुपये लई होतेत असे म्हणालो असता, त्यांनी मला काय द्यायचे ती द्या असे सांगितले. त्यावर मी त्यांना दिड हजार रुपये देतो असे म्हणालो असता श्री.आगलावे यांनी ठिक्य असे सांगितले. श्री.आगलावे यांनी माझ्याकडे मंजुर कांदा चाळीचे अनुदान मिळण्याकरीता कांदा चाळीचा मोका तपासणी अहवाल व बिलं अपलोड करण्यासाठी पंचासमक्ष 2000/-रु.लाचेची मागणी करुन तडजोड अंती 1500/-रुपये लाच रक्कम स्वत: स्विकारण्याचे मान्य केले. श्री.आगलावे यांनी काम चालुय, परत कधाला येता असे म्हणाल्याने श्री.आगलावे यांचे विरुध्द उद्या दिनांक 31/05/2023 रोजी लाचेच्या सापळा कारवाईचे आयोजन करण्याचे ठरले. त्याबाबत दिनांक 30/05/2023 रोजी लाचमागणी पडताळणी पंचनामा केला आहे. दिनांक 31/05/2023 रोजी पोनि/परदेशी हे पंच व स्टाफसह पाटोदा येथे सुरक्षीत ठिकाणी हजर आले. पोनि/परदेशी यांनी श्री.आगलावे यांचेविरुध्द लाचेच्या सापळा कारवाईचे आयोजन करण्यात येणार असुन सापळा कारवाईसाठी अॅन्थ्रासीन पावडर व अल्ट्राव्हायलेट लॅम्पचा उपयोग होणार असल्याचे सांगुन त्याबाबत मला व पंचाना माहिती देऊन प्रात्यक्षिक करुन दाखवले तसेच मी हजर केलेल्या लाच रक्कम 1500/-रुपयास अॅथ्रासीन पावडर लावुन मला, सापळा पथक व पंचांना कारवाईचे अनुषंगाने सुचना दिल्या. श्री.आगलावे यांनी लाचेची रक्कम स्विकारल्या नंतर सापळा पथकातील अधिकारी/ अंमलदार यांना दिसेल अशा दर्शनी ठिकाणी येवुन त्यांचेजवळील कापडी पिशवी डोक्यावर धरावी असा ईशारा नेमुन दिला. त्याबाबत दिनांक 31/05/2023 रोजी सापळा पुर्व कारवाईचा पंचनामा केला आहे. सापळा पुर्व कारवाईचा पंचनामा पुर्ण झाल्यानंतर पोनि/परदेशी यांचे सुचनेवरुन पोशि/गारदे यांनी व्हईस रेकॉर्डर माझे बनियनला डावे बाजुस सुरक्षीत बांधुन व्हईस रेकॉर्डर चालु करुन मला व पंच क्रमांक 1 श्री.गायकवाड यांना श्री.आगलावे यांचेकडे तालुका कृषी अधिकारी कार्यालय, पाटोदा येथे पाठवुन लाचेच्या सापळ्याचे आयोजन केले असता, मी व पंच क्रमांक 1 श्री.गायकवाड असे तालुका कृषी अधिकारी कार्यालयातील मंडळ कृषी अधिकारी पाटोदा क्रमांक-2 चे कक्षामध्ये गेलो. त्याठिकाणी माझी व श्री.आगलावे यांची भेट झाली. भेटी दरम्यान मी एक बिलाची पावती त्यांचेकडे दिली व बाकीचं बील चार वाजता घेऊन येतो असे सांगीतले. त्यावेळी श्री.आगलावे यांनी माझ्याकडे इशाऱ्याने पैशाची मागणी करुन बील घेऊन या असे सांगीतले. त्यावेळी मी माझ्या पँटचे समोरील उजवे बाजुचे खिशातील लाच रक्कम 1500/-रु. बाहेर काढुन श्री.आगलावे यांचेसमोर धरली असता, श्री.आगलावे यांनी लाच रक्कम 1500/-रु. उजवे हाताने स्विकारुन त्यांनी अंगावर परिधान केलेल्या पँटचे समोरील उजवे बाजुचे खिशात ठेवली. त्यावेळी मी त्यांना पंधराशे रुपये आणलेत सांगीतल्याप्रमाणे असे म्हनुन लवकर काम करण्यास सांगीतले त्यावेळी श्री.आगलावे यांनी ठिक्य असे सांगीतले. त्यानंतर मी कार्यालयाचे बाहेर येवुन मला लाच स्विकृती नंतर करावयाचा नेमुन दिलेला पुर्वनियोजीत इशारा 14.18 वा.केला.इशारा प्राप्त होताच पोनि/परदेशी, सापळा पथकातील सर्व सदस्य व पंच क्रमांक 2 श्री.शेख आमचेजवळ आले. पोशि/गारदे यांनी माझ्याकडील व्हईस रेकॉर्डर बंद करुन ताब्यात घेतले. पोनि/परदेशी यांनी श्री. आगलावे यांना त्यांची स्वत:ची, दोन्ही पंचांची व सापळा पथकातील सदस्यांची ओळख करुन दिली. पोनि/परदेशी यांनी पंच क्र.1 श्री.गायकवाड यांना पंच क्र.2 श्री.शेख यांचे समक्ष विचारणा केली की, मला कोणी लाचेची मागणी केली व माझेकडुन कोणी लाच रक्कम स्वीकारली. तेव्हा पंच क्र.1 श्री.गायकवाड यांनी सांगितले की, श्री.आगलावे यांनी माझ्याकडे इशाऱ्याने लाचेची मागणी करुन 1500/-रु. लाच रक्कम उजवे हाताने स्विकारुन त्यांनी अंगावर परिधान केलेल्या पँटच्या समोरच्या उजव्या बाजुच्या खिशात ठेवली आहे असा खुलासा पंच क्रमांक 1 श्री.गायकवाड यांनी केला. पोनि/परदेशी यांनी श्री.आगलावे यांना त्यांचे नाव गाव विचारले असता, त्यांनी त्यांचे नाव श्री.कृष्णा महादेव आगलावे, वय-40 वर्ष, व्यवसाय नौकरी, कृषी सहाय्यक अंमळनेर अतिरीक्त पदभार मंडळ कृषी अधिकारी पाटोदा क्रमांक-2, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, पाटोदा जि.बीड मुळ रा.धस पिंपळगाव ता.पाटोदा जि.बीड ह.मु.शिवकृपा सदन, मांजरसुंबा रोड, पाटोदा ता.पाटोदा जि.बीड (वर्ग-3) असे सांगीतले. पोनि/परदेशी यांनी श्री.आगलावे यांना लाच रक्मे बाबत विचारणा केली असता, त्यांनी लाच रक्कम त्यांचे पँटचे समोरील उजवे बाजुचे खिशात ठेवली असल्याचे सांगीतले. पोनि/परदेशी यांनी सदरची लाच रक्कम पंच क्रमांक 2 श्री.शेख यांना श्री.आगलावे यांचे खिशातुन बाहेर काढुन ताब्यात घेऊन खात्री करण्यास सांगितले. पंच क्रमांक 1 यांनी सापळापुर्व कारवाईचा पंचनामा मधील नोटांचे क्रमांक वाचुन दाखवले. त्यावर पंच क्रमांक 2 श्री.शेख यांनी लाचेच्या नोटांची खात्री करुन सापळापुर्व पंचनाम्यातील नोटांशी तंतोतंत मिळुन आल्याचे कळवले. पोनि/परदेशी यांनी सदरच्या नोटा पंच क्रमांक 2 श्री.शेख यांना ताब्यात ठेवण्यास सांगीतल्या. पोनि/परदेशी यांनी माझे कामासंदर्भातील कागदपत्र श्री.आगलावे यांचेकडुन ताब्यात घेतले. पोनि/परदेशी यांनी घटनास्थळावर प्राथमीक कारवाई करुन पुढील कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड येथे करण्यात येणार असल्याचे सांगीतले. त्यानंतर मी, पोनि/परदेशी, सापळा पथकातील सदस्य, दोन्ही पंच, श्री.आगलावे असे तालुका कृषी अधिकारी कार्यालय, पाटोदा येथुन रवाना होऊन लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, बीड येथे हजर आलोत. तसा आज दिनांक 31/05/2023 रोजी सविस्तर यशस्वी सापळा कारवाईचा पंचनामा केला आहे. तरी दिनांक 30/05/2023 रोजी लोकसेवक श्री.कृष्णा महादेव आगलावे, वय-40 वर्ष, व्यवसाय नौकरी, कृषी सहाय्यक अंमळनेर अतिरीक्त पदभार मंडळ कृषी अधिकारी पाटोदा क्रमांक-2, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, पाटोदा जि.बीड मुळ रा.धस पिंपळगाव ता.पाटोदा जि.बीड ह.मु.शिवकृपा सदन, मांजरसुंबा रोड, पाटोदा ता.पाटोदा जि.बीड (वर्ग-3) यांनी तक्रारदार श्री.दिलीप आश्राजी सानप, वय-48 वर्ष, व्यवसाय शेती, रा.सौताडा ता.पाटोदा जि.बीड यांचेकडे त्यांचे मंजुर कांदा चाळीचे अनुदान मिळण्याकरीता कांदा चाळीचा मोका तपासणी अहवाल व बिलं अपलोड करण्यासाठी पंचासमक्ष 2000/-रु.लाचेची मागणी करुन तडजोड अंती 1500/-रुपये लाच रक्कम स्वत: स्विकारण्याचे मान्य करुन आज दिनांक 31/05/2023 रोजी 14.18 वा. तालुका कृषी अधिकारी कार्यालय, पाटोदा येथील मंडळ कृषी अधिकारी पाटोदा क्रमांक-2 यांचे कक्षामध्ये लाच रक्कम 1500/-रु. पंचासमक्ष स्विकारले असता, लोकसेवक श्री.आगलावे यांना लाचेच्या रक्मेसह रंगेहात पकडले म्हनुन माझी त्यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे. माझी वरील फिर्याद माझे सांगणेप्रमाणे संगणकावर टंकलिखीत केली असुन प्रिंट काढल्यानंतर वाचुन पाहिली ती बरोबर व खरी आहे.

**13. Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): PRATAP MANIKRAO NAVGHARE(I (Inspector)) / API **or** (किंवा)

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
**Rank** (पद):
**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15. Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
पोलीस ठाणे,पाटोदा
ता.पाटोदा जि.बीड

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): PRATAP MANIKRAO NAVGHAR
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): API